# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

## औरंगाबाद

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

## परिपत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२० मध्ये होणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षा व इतर सत्र/वर्षामध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा दिनांक ०१ ऑक्टोबर २०२० पासून घेण्याचे विद्यापीठाने आयोजिले आहे. या संबधित सर्व अभ्यासक्रमांचे/सर्व विषयांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

याबाबत सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य व इतर संबधितांना कळविण्यात येते की, ही परीक्षा कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भामुळे एका तासाची ठेवण्यात आलेली असुन ही बहूपर्यायी पध्दतीने (MCQ) ऑनलाईन घेण्यात येत आहे. ज्या विद्यार्थ्यां जवळ मोबाईल, आय-पॅड, संगणक उपलब्ध आहे किंवा ही सोय त्यांना त्यांच्या घरा जवळच्या या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/एम.के.सी.एल. केंद्राकडुन उपलब्ध होत असेल व तशा प्रकारचा पर्याय त्यांनी निवडलेला असेल त्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा ऑनलाईन पध्दतीने देता येईल.

ज्या विद्यार्थ्यांना ही सुविधा उपलब्ध नाही त्यांची परीक्षा त्यांनी निवडलेल्या महाविद्यालयामध्ये OMR पध्दतीने त्या महाविद्यालयात घेण्यात येईल.

**विद्यापीठानी प्रसिध्द केलेले वेळापत्रक हे परीक्षेच्या दोन्ही पध्दतीसाठी (ऑनलाईन/ऑफलाईन) लागु राहील. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वेळापत्रकामध्ये दर्शविलेल्या सकाळी ०९ ते ०१ पर्यंत व दुपारी ०२ ते सायंकाळी ०६ पर्यंत या वेळेत एका तासात सोडवावयाची आहे.**

ज्या विद्यार्थ्यांनी OMR पध्दतीने महाविद्यालयात जाऊन परीक्षा द्यावयाचा पर्याय निवडला आहे. त्या विद्यार्थ्यांनी सकाळी ०९ ते ०१ या वेळेमधील पहिल्या तासात म्हणजेच सकाळी ०९ ते १० या वेळात व दुसऱ्या सत्रात दुपारी ०२ ते ०६ या वेळेमधील पहिल्या तासात म्हणजे दुपारी ०२ ते ०३ या वेळेमध्येच परीक्षा देणे बंधनकारक आहे. याची संबधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद :
संदर्भ क्र.: परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२०/ ९९९ :
दिनांक : १०.०९.२०२० :

**प्रा. योगेश पाटील**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ